महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६५ वा | दिनांक : ०४/१२/२०२४ | वार : बुधवार

## दिल्लीतून भाजपचे नेते डमरू वाजवतात तर राज्यातील नेते नाचतात : संजय राऊत



**मुंबई :** महाराष्ट्रामध्ये सरकार बनवायचे असताना अनेक नेते हे दिल्लीत फिरताना दिसत आहेत. देशातील विरोधी पक्ष नेता संपवण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. राज्यपालांनी दहा दिवसानंतर देखील सत्ता स्थापनेचे निमंत्रण दिलेले नाही. तरी देखील आझाद मैदानावर शपथविधीची तयारी सुरू आहे. हे सर्व कोण करत आहे? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. ही सर्व दिल्लीतून सुरू असलेली 'मर्कट लीला' असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री या आहेत. असे असताना मुख्यमंत्री कसा नाराज किंवा गायब होऊ शकतो? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. दिल्लीमध्ये ईडी, सीबीआय अशी सर्व यंत्रणा आहे. मात्र तरी देखील हा सर्व खेळ सुरू असल्याचा आरोप राऊत यांनी केला. स्पष्ट बहुमत असताना देखील अद्याप मुख्यमंत्री पदाचे नाव, भाजप विधिमंडळ पक्षाचा नेता घोषित करू शकले नाहीत. स्पष्ट बहुमत असतात देखील अद्याप राजभवनात जाऊन सरकार स्थापन करण्याचा दावा करण्यात आलेला नाही. तसेच राज्यपालांकडून देखील अद्याप सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रण दिलेले नाही. तरी देखील आझाद मैदानावर एवढा मोठ्या प्रमाणात तयारी सुरू असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. हे कोणाच्या आदेशाने सुरू आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

हा सर्व दिल्लीचा खेळ असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र मध्ये सध्या मर्कट लीला चालू असल्याचा आरोप देखील राऊत यांनी केला. दिल्लीतून भाजपचे नेते डमरू वाजवत आहेत आणि दुसरीकडे महाराष्ट्रातील नेते नाचत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस यांना डावल्यासाठीच एखाद्या महाशक्तीचा डाव चालला आहे का? असा प्रश्न देखील राऊत यांनी उपस्थित केला. याबाबत लवकरच सर्व स्पष्ट होईल, असे देखील राऊत यांनी म्हणाले आहे. एकनाथ शिंदे यांच्यात एवढी हिंमत नाही. दिल्लीतील नेत्यांची साथ असल्याशिवाय ते असे वागू शकत नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

## महायुतीचे संभाव्य खातेवाटप समोर

**मुंबई :** महायुतीचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी होणार असून मुख्यमंत्री पद तसेच खातेवाटपाबाबत कोणताही निर्णय झाला नाही. मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतल्यानंतर एकनाथ शिंदे गृहमंत्री पदासाठी अडून बसल्याची माहिती आहे. अशातच आता महायुतीच्या खातेवाटपाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे. यामध्ये भाजप स्वत:कडे २१ ते २२ खाती ठेवणार असल्याचे सूत्रांकडून समजते आहे.

महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकामध्ये भाजपकडे २१ ते २२ खाती असू शकतात. यामध्ये गृह मंत्रालय तसेच सभापतीपद भाजपला मिळण्याची शक्यता आहे. भाजपकडून पंकजा मुंडे, अतुल सावे, गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे पाटील, आशिष शेलार, अतुल भातखळकर, शिवेंद्रसिंहराजे भोसले, चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. भाजपचे १६ मंत्री शपथ घेणार असल्याची माहिती आहे.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे ११ ते १२ खाती मिळून शकतात. यामध्ये एकनाथ शिंदे, दादा भुसे, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, अर्जुन खोतकर, संजय राठोड आणि उदय सामंत यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १० खाती मिळणार असून अद्यापही कोणाला संधी मिळणार ही माहिती समोर आली नाही. मात्र, अर्थ खाते हे राष्ट्रवादीकडेच जाणार असल्याची माहिती आहे.

भाजपकडे गृह आणि महसूल सारखे खाते कायम राहू शकते. याशिवाय त्यांना सभापती आणि विधान परिषद अध्यक्ष पदही मिळू शकते. राष्ट्रवादीला अर्थ, तर शिंदेंच्या शिवसेनेला शहरी विकास खाते मिळू शकते. याशिवाय इतर खात्यांवर नंतर चर्चा केली जाणार आहे. तत्पूर्वी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे महायुतीचे तिनही नेते मुंबईत बैठक घेऊन नवीन मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युल्यावर चर्चा करणार आहेत. मात्र, कार्यवाहक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती अद्यापही खालावलेलीच असल्याने बैठका टळत आहेत.

मुख्यमंत्रिपद भाजपकडे गेल्यानंतर एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. एकनाथ शिंदे गृह खात्यासाठी अडून बसल्याची माहिती होती. दरम्यानच्या काळात एकनाथ शिंदे यांची तब्येत बिघडल्याने महायुतीची बैठक झाली नाही. त्यामुळे खातेवाटपाबाबत चर्चा होऊ शकली नाही. पण आता शिंदेंच्या शिवसेनेकडून हालचाली सुरू असून उदय सामंतांनी देवेंद्र फडणवीसांची सागर बंगल्यावर भेट घेतली आहे. या भेटीत गुरूवारी होणाऱ्या शपथविधीच्या तयारीवर चर्चा झाली असून उदय सामंत यांनी देवेंद्र फडणवीसांसमोर शिवसेनेचा प्रस्ताव ठेवल्याची माहिती आहे

## आचरेकरांसारखे खेळाडू कोणत्याच कोचने घडवले नाही : राज ठाकरे

**मुंबई :** रमाकांत आचरेकर गुरुजी यांच्या स्मारकाचे लोकार्पण मुंबईत करण्यात आले. यावेळी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर तसेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले. सचिन तेंडुलकर हे आचरेकर सरांचे शिष्य आहेत. या प्रसंगी राज ठाकरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना भाषण देखील केले.

रमाकांत आचरेकरांचे स्मारक आधीच व्हायला पाहिजे होते. आचरेकर सर म्हंटलं की सचिन तेंडुलकर हे एकच नाव आपल्या डोळ्यासमोर येतं. पण मला वाटत नाही जगात आचरेकर सरांनी जेवढे खेळाडू निर्माण केले आपल्या देशासाठी तेवढे जगात कुठल्या कोचने एवढे खेळाडू केले असतील असं मला वाटत नाही, असं राज ठाकरे म्हणाले.

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, अनेक गोष्टी ज्यावेळी आपल्या देशात, महाराष्ट्रात होतात त्यावेळी अशा लोकांची खरं तर नावं द्यायला पाहिजेत. जेव्हा फ्लायओव्हर होतात, ब्रिज होतात, रस्ते होतात, आमच्याकडे सगळ्यात मोठा रस्ता तो महात्मा गांधी रोड आहे. पण महात्मा गांधींचे जे गुरु होते ते गोपळकृष्ण गोखले हे आमचं गोखले रोड, असं म्हणत राज ठाकरे यांनी लहान रस्त्याकडे बोट दाखवले. गुरुची काय किंमत असते आणि गुरुची काय किंमत असावी आणि त्याला किती पुजावं किती मोठं करावं आणि लोकांसमोर ठेवावं हे आपल्याकडे नाहीच, म्हणजे शिक्षक नावाची गोष्टच आपल्याकडे राहिलेली नाही, असं राज ठाकरे म्हणाले.

माझ्याकडे जेव्हा दहावी बारावीची मुलं येतात, मी विचारतो मग काय करणार पुढे? मग ते म्हणतात इंजिनियर होणार, आर्किटेक्ट होणार, डॉक्टर होणार. एक विद्यार्थी मला आजपर्यंत बोललेला नाही की मला शिक्षक व्हायचं आहे. या देशात मुलांना शिक्षक व्हावंसं वाटत नाही त्या देशाचं पुढे काय होणार माहीत नाही मला. पण मला असं वाटतं की असलेले जे शिक्षक आहेत, असलेले जे गुरु आहेत, द्रोणाचार्य म्हणून अवॉर्ड द्यायचा पण द्रोणाचार्य म्हणून पूजायचं नाही.

मी दरवर्षी बघायचो आमच्या तिथेच आचरेकर सर राहायचे. दरवर्षी गुरुपौर्णिमेला सचिन तेंडुलकर न चुकता यायचे. आता आपल्याकडे गुरुपौर्णिमा ही मोबाईलवर राहिली आहे. हॅप्पी गुरुपौर्णिमा! हे हॅप्पी गुरुपौर्णिमा काय असतं हे मला अजूनपर्यंत कळलेलं नाही. अजून एक मेसेज असतो, ज्या ज्या लोकांनी माझ्या आयुष्यासाठी जे केले आहे.. अरे त्यात मी आहे की नाही, मला का पाठवलं आहे? कल्पनाच नसते आम्हाला, असं राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे म्हणाले, आचरेकर सरांचं योगदान इतकं मोठं आहे की त्यांचं इथं स्मारक व्हावं, असं मला पहिल्यापासून मनापासून वाटत होतं. आमचे सुनील रमणी यांच्याशी मी बोललो आणि त्यांना मी सांगितलं की असं असं आपण एक स्मारक बनवूया. पण मला इथे आचरेकर सरांचा पुतळा नको होता, कारण पुतळे खूप झाले आहेत आपल्याकडे. मी म्हणलं काही तरी वेगळं करूया, ज्यातून आचरेकर सरांची ओळख, योगदान या सगळ्या मुलांना पण कळेल येणाऱ्या. आचरेकर सरांनी जे संस्कार केले आहेत या खेळाडूंवरती ते यांच्याकडे बघून दिसतं आपल्याला.

जसं तुमच्याकडे क्रिकेट आता बदलत गेलं तसं आमच्याकडे पण राजकारण बदलत गेलं. तुमच्याकडे अंपायरनी आऊट दिल्यावर तुमच्याकडं थर्ड अंपायर असतो, गेल्या निवडणूकीला आम्हाला जर थर्ड अंपायर मिळाला असता तर मला वाटतं अनेक निर्णय बदलले असते. पण आमच्याकडे थर्ड अंपायर नसल्याने आम्हाला काही करता येत नाही. आपल्याकडे परवाणग्या मिळवणं सगळ्यात कठीण असतं. महानगरपालिका, राज्य सरकार यासगळ्यातून परवाणग्या मिळवणं इतकं कठीण असतं आपल्याकडे अनधिकृत काम करायला परवानगीची गरज लागत नाही. पण अधिकृत करायचं म्हणलं की परवानगी लागते. यामुळे स्मारक बनवण्यासाठी खूप वेळ गेला, असं म्हणत राज ठाकरे यांनी प्रशासनावर टीका केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ४ डिसेंबर २०२४

## शिंदेंच्या नाराजीला भाजपच्या दिल्लीतील नेत्यांची रसद : उद्धव ठाकरे

**मुंबई** काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कथित नाराजीला भाजपचे दिल्लीतील काही नेते रसद पुरवत असल्याचा मोठा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे महायुती विशेषतः भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात एकच खळबळ माजली आहे.

उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी शिवसेनेच्या नगरसेवकांची मातोश्रीवर एक बैठक बोलावली होती. या बैठकीत बीएमसीच्या निवडणुकीची रणनीती आखण्यात आली. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांची नाराजी भाजपतील नेत्यांच्या बळावर सुरू असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, महायुतीमध्ये सत्तास्थापनेचा जो तिढा निर्माण झाला आहे आणि जो खेळ सुरु आहे, या सगळ्यात एकनाथ शिंदे यांना दिल्लीतील भाजपचे काही नेते रसद पुरवत आहेत.

ते पुढे म्हणाले, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपर्यंत भाजप एकनाथ शिंदे यांना गोंजारेल. पण एकदा निवडणुकीचा हेतू साध्य झाला की, त्यांचे काय करायचे ते करेल. भाजपने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आव आणून आपल्या विविध यंत्रणा राबवल्या. त्यांनी आरएसएसचा वापर केवळ पत्रके वाटण्यापुरता केला. सध्या सुरु असलेल्या सत्तास्थापनेच्या वादात शिंदेंच्या मागे दिल्लीतील भाजपची मोठी शक्ती आहे. भाजपचा मूळ उद्देश मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकण्याचा आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## मुंबईत दुकानदाराची मराठी महिलेसोबत अरेरावी : भाजपचे सरकार आले, आता मारवाडीत बोलायचे




**मुंबई** : मुंबईच्या गिरगाव येथील किराणा दुकानदाराने एका मराठी महिलेला बोलताना आता मारवाडीमध्ये बोला आता भाजपचे सरकार आले आहे, असे म्हंटले. यावर संतप्त झालेल्या महिलेने या दुकानदाराची तक्रार भाजपसोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे केली आहे. यानंतर मनसैनिकांनी या दुकानदाराला खेतवाडीच्या मनसेच्या कार्यालयात बोलवून चांगलाच चोप दिला आहे. तसेच या दुकानदाराला महिलेची माफी देखील मागायला लावली आहे.

महिलेच्या म्हणण्यानुसार, सोमवारी या व्यक्तीच्या दुकानात गेले तेव्हा मी बोलत असताना हा म्हणतो की मारवाडीमध्ये बोला. आता भाजपचे सरकार आले आहे. त्यामुळे मारवाडीमध्ये बोलायचे, मराठीत नाही बोलायचे. मुंबई भाजपची, मुंबई मारवाडीची, असे उद्धटपणे या दुकानदाराने म्हंटले. तसेच पुढे बोलताना त्या महिला म्हणाल्या की, मी याबाबत भाजप नेते लोढा साहेबांकडे गेले होते, तेव्हा ते म्हणाले की, तुम्ही आमच्यात भांडणे लावत आहात. आम्ही या लोढा साहेबांना आम्ही पाठिंबा दिला, दक्षिण मुंबईमध्ये आम्ही त्यांना निवडून दिले आणि ते मला समोरून म्हणतात मी यांना ओळखत नाही. तुम्ही आमदार आहात तरी तुम्हाला ओळखच पाहिजे का? त्यामुळे आता मला आणि सगळ्या मराठी बंधू व भगिनींना न्याय पाहिजे, अशी मागणी देखील यांनी केली आहे.

घडलेल्या घटनेनुसार, महिलेने आधी भाजप आमदार मंगलप्रभात लोढा यांच्याकडे तक्रार दिली होती. मात्र, त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे महिलेने सांगितले आहे. तसेच हे असे सांगून तुम्ही आमच्यात भांडण लावत आहात, असे देखील लोढा म्हणाले असल्याचे या महिलेने सांगितले आहे. मात्र या प्रकरणावर मनसेने मात्र थेट कारवाई केल्याचे समोर आले आहे. मनसे कार्यकर्त्यांनी खेतवाडी येथील कार्यालयात बोलवत या दुकानदाराला चांगलाच चोप दिला असून महिलेची माफी देखील मागायला लावली आहे.

## एकनाथ शिंदेंना उपमुख्यमंत्री सह गृहमंत्रीपद द्यावे अशी आमची इच्छा - गुलाबराव पाटील



**मुंबई** : एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद मिळावे अशी आमची पूर्वीपासूनच मागणी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पाहता त्यांना हे पद मिळाले असते तर फायदा झाला असता. भाजप नेत्यांना काय वाटते आम्हाला माहिती नाही. पण शिंदेंना उपमुख्यमंत्रीपदासह गृहमंत्रीपद दिले जावे अशी आमची मागणी आहे, असे शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे.

गुलाबराव पाटील येथे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच सरकार स्थापनेत आपली कोणतीही आडकाठी येणार नसल्याचे म्हटले आहे. त्यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचे आदेश आपल्याला मान्य असल्याचेही सांगितले आहे. आम्ही त्यांचे आदेश पाळणारे शिवसैनिक आहोत. पण एकनाथ शिंदे यांनी सत्तेत रहावे, त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे ही आमची मागणी आहे. कारण, त्यांचे भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासह राज्यातील नेतृत्वाशी चांगले संबंध आहेत. त्यामुळे त्यांचा योग्य तो सन्मान राखला जाईल.

केंद्रीय नेतृत्वाकडे आम्ही गृहमंत्रीपदाची मागणी केली आहे. पण त्यांचा निर्णय आम्हाला मान्य असेल. त्यामुळे आता या प्रकरणी कोणता निर्णय घ्यायचा हे सर्वस्वी राज्याच्या नव्हे तर केंद्रीय नेतृत्वावर अवलंबून आहे.

ते पुढे म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री व्हावे ही सर्वांची इच्छा होती. पण शेवटी ३ पक्षांचे सरकार आहे. तिन्ही पक्षांत समतोल साधण्यासाठी केंद्रीय नेतृत्व जो काही निर्णय घेईल तो आम्ही मान्य करू. तूर्त स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होईपर्यंत मुख्यमंत्रीपद एकनाथ शिंदे यांच्याकडे हवे होते. कारण, त्याचा महायुतीला फायदा झाला असता. पण नेतृत्वाने ही गोष्ट सोडल्यामुळे आम्ही त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. आता एकनाथ शिंदे यांना गृहमंत्रीपद मिळावे अशी आमची मागणी आहे.

आम्ही हिंदुत्वासाठी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांसाठी भाजपशी युती केली. सत्ता आल्यानंतर अजित पवार आले. तेव्हा आम्ही विरोध केला नाही. भाजपच्या नेतृत्वाच्या निर्णयाला साथ दिली. ते आल्यामुळे आम्हाला विधानसभेत कमी जागा मिळाल्या. ते आले नसते तर जास्त जागा मिळाल्या असत्या. याचा अर्थ आमच्या जास्त जागा निवडून आल्या असत्या. पण काही लोकांनी माझ्या विधानाचा चुकीचा अर्थ काढला. शिंदे व भाजपची युती हिंदुत्वासाठी युती झाली आहे. ही विचारांची युती असल्यामुळे ती तुटण्याची शक्यता नाही.

एकनाथ शिंदे आता बरे झालेत. त्यांच्या आदेशाने आम्ही पुन्हा कामाला लागलो आहोत. तब्येतीच्या कारणामुळे ऑनलाईन बैठका होणार आहेत. त्यात काय झाले हे नंतर सांगितले जाईल, असेही गुलाबराव पाटील यावेळी बोलताना म्हणाले.

गुलाबराव पाटील यांनी यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावरही निशाणा साधला. संजय राऊत यांनी शिवसेना संपवली, उद्धव ठाकरे यांना संपवले, तसेच काँग्रेस व राष्ट्रवादीही संपवली. हा माणूस रोगट आहे. चिकनगुन्यासारखा आहे. त्याने उद्धव ठाकरे यांना चुकीची माहिती देऊन अक्षरशः वेडे केले. आज त्यांच्यामुळेच शिवसेना २० आमदारांवर घसरली आहे, असे ते म्हणाले.

## प्रकाश आंबेडकर यांच्या स्वाक्षरीने EVM हटाव मोहीम सुरू



**अकोला** : वंचित बहुजन आघाडीच्या EVM विरोधात स्वाक्षरी मोहीमेला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वाक्षरी करत सुरुवात केली. त्यांनतर अकोला येथे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून स्वाक्षरी करण्यात आली.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात EVM विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्प्याटप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून ३ ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात EVM विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना EVM विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २००४ पासून अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात EVM विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. EVM च्या विरोधात न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून EVM मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. EVM च्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे.

विधानसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला एकही जागेवर यश मिळाले नाही. मात्र, वंचितमुळे महायुतीचा एक-दोन नव्हे, तर तब्बल २० जागांवर फायदा झाल्याचे समोर आले आहे. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ८, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ६ आणि काँग्रेसचे ६ उमेदवार पडलेत. विधानसभेत आलेल्या भाजपच्या आणि लाडक्या बहिणीच्या लाटेत मुस्लीम मतदार वंचितच्या पाठीमागे मोठ्या संख्येने उभा राहिल्याचे दिसून आले. याचा फटका मात्र महाविकास आघाडीला बसल्याचे दिसले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ४ डिसेंबर २०२४


## एकनाथ शिंदे स्वाभिमानी असतील तर सरकारमध्ये सहभागी होणार नाही : सचिन खरात




**मुंबई** : एकनाथ शिंदे स्वाभिमानी असतील तर सरकारमध्ये त्यांचा पक्ष सामील होणार नाही, असे वक्तव्य रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गटाचे नेते सचिन खरात यांनी केले आहे. तर दुसरीकडे अंजली दमानिया यांचे एकनाथ शिंदे विरोधी पक्षात बसणार? असे ट्विट केल्याने आता राजकीय वर्तुळात शिंदे सत्तेपासून खरच दूर राहत विरोधी पक्षनेतेपद घेणार का अशी चर्चा सुरू आहे.

सचिन खरात म्हणाले की, महाराष्ट्र राज्यामध्ये काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना चालू केल्यानेच महायुतीला यश मिळाल्याची चर्चा राज्यामध्ये आहे. निकालाला इतके दिवस होऊन सुद्धा आजतागायत महायुतीचे सरकार स्थापन झालेले नाही. महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या आहेत. या निवडणुकीमध्ये महायुतीला यश मिळाल्याचे दिसून येत आहे.

सचिन खरात म्हणाले की, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज आहेत आणि ते मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे, असे त्यांचे प्रवक्ते बोलत आहेत. म्हणूनच आमचे मत आहे की, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वाभिमानी असतील तर सरकारमध्ये त्यांचा पक्ष सामील होणार नाही असे खरात यांनी म्हटले आहे.

# अजित पवारांचा गृहनिर्माण खात्यावर दावा



**मुंबई** : काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची कथित नाराजी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पथ्यावर पडण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी भाजपकडे 'मलाईदार' गृहनिर्माण खात्याची मागणी केली आहे. यामुळे तसे संकेत मिळत आहेत. 'द इंडियन एक्सप्रेस'ने आपल्या एका वृत्तात हा दावा केला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. पण १० दिवस लोटले तरी या आघाडीला अद्याप आपले सरकार स्थापन करता आले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कथित नाराजीमुळे ही प्रक्रिया लांबणीवर पडल्याचे चित्र आहे. शिंदे यांनी सोमवारी दिवसभरातील आपल्या सर्वच बैठका रद्द केल्या. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबतची भेटही टाळली. यावरून त्यांची नाराजी स्पष्टपणे दिसून येत आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार हे अमित शहा यांची भेट घेण्यासाठी दिल्लीत पोहोचलेत. या भेटीत ते त्यांच्यासोबत महायुती सरकारच्या संभाव्य खातेवाटपावर चर्चा करणार आहेत. 'द इंडियन एक्सप्रेस'ने राष्ट्रवादीच्या एका ज्येष्ठ नेत्याचा दाखला देत म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसने कोणतीही अवाजवी मागणी केली नाही. अडीच वर्षापूर्वी जेव्हा आम्ही महायुती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला, तेव्हाच गृहनिर्माण खात्याची मागणी केली होती. आता नवे सरकार स्थापन होत असताना आम्ही त्याचा खात्याचा आग्रह धरला आहे. हे खाते आमच्या यादीतील अत्यंत महत्त्वाचे खाते आहे.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये गृहनिर्माण खाते भाजप नेते अतुल सावे यांच्याकडे होते. तत्पूर्वी, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये हे खाते राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्याकडे होते. त्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी करून महायुती सरकारमध्ये सहभागी झाले. तेव्हा त्यांच्या पक्षाला ९ मंत्रिपदे देण्यात आली होती.

त्यात अजित पवारांना उपमुख्यमंत्रीपदासह अर्थ व नियोजन खाते सोपवण्यात आले होते. तर छगन भुजबळ यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा, दिलीप वळसे पाटील यांच्याकडे सहकार, हसन मुश्रीफ यांच्याकडे वैद्यकीय शिक्षण, धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन, धनंजय मुंडे यांच्याकडे कृषी, आदिती तटकरे यांच्याकडे महिला व बाल कल्याण, अनिल पाटील यांच्याकडे मदत व पुनर्वसन आणि संजय बनसोडे यांच्याकडे युवक, क्रीडा व बंदरे विकास अशी खाते देण्यात आली होती.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर लगेचच अजित पवार यांनी महाराष्ट्रात आता भाजपचा मुख्यमंत्री होईल असे जाहीर केले होते. विशेषतः आपला मुख्यंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा असल्याचीही घोषणा केली होती.





शाळा, महाविद्यालय, सामाजिक व राजकीय संघटना, समाजसेवी संस्था आणि इतर समाजोपयोगी कार्यक्रमाचे व्हिडीओ क्लीप किंवा कार्यक्रमांची बातमी तयार करून पाठविल्यास आम्ही आमच्या महाराष्ट्र जनशक्ती न्युज युट्युब चॅनलवर प्रसारित करू. तसेच कार्यक्रमाच्या बातम्या व फोटो आमच्या दैनिक महाराष्ट्र जनशक्ती ऑनलाईन वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करू त्याचबरोबर कविता, कथा, सामाजिक, वैचारिक लेख ही दैनिकात प्रसिद्ध करण्यात येतील.

तरी आपण 7588005002 या व्हॉट्सअॅप नंबरवर कार्यक्रमाचे व्हिडीओज, बातम्या, कथा, कविता, लेख इ. पाठवावेत.

संपादक - डॉ. हसन इनामदार


## भारत-चीन संबंधांमध्ये थोडी सुधारणा झाली : परराष्ट्र मंत्री एस जयशंकर

**नवी दिल्ली** : परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी मंगळवारी भारत-चीन सीमा वादावर संसदेत माहिती दिली. परराष्ट्रमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, भारत आणि चीन सीमा विवाद संवाद आणि मुत्सद्देगिरीने सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. पूर्व लडाखमध्ये पूर्ण विल्हेवाट लावण्यात आली आहे. तथापि, LAC वर अनेक भागात अजूनही वाद आहे. दोन्ही देशांना मान्य असलेला तोडगा काढणे हा भारताचा उद्देश आहे.

ते म्हणाले, '२०२० पासून भारत आणि चीनमधील संबंध सामान्य नाहीत. सीमेवर शांतता भंग झाला. तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध चांगले नाहीत. मात्र, नुकत्याच झालेल्या चर्चेमुळे परिस्थिती काहीशी सुधारली आहे.

पूर्व लडाखमधील सीमावादावरून भारत आणि चीनमध्ये चार वर्षांपासून तणाव होता. दोन वर्षांच्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर ऑक्टोबरमध्ये दोन्ही देशांमध्ये करार झाला. यानंतर दोन्ही देशांच्या सैन्याने डेपसांग आणि डेमचोकमधून माघार घेतली आहे.

परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले की, भारत आणि चीनमधील संबंध सुधारण्यासाठी मी चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांशी चर्चा केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी चीनच्या आपल्या समकक्षांशीही चर्चा केली. याव्यतिरिक्त, राजनयिक स्तरावर वर्किंग मेकॅनिज्म फॉर कोऑपरेशन अँड कोऑर्डिनेशन (WMCC) आणि सीनियर हाईएस्ट मिलिट्री कमांडर्स (SHMC) बैठका आहेत. जून २०२० पासून आत्तापर्यंत WMCC च्या १७ बैठका आणि SHMC च्या २१ बैठका झाल्या. त्यानंतर २१ ऑक्टोबर २०२४ रोजी डेपसांग आणि डेमचोक भागात करार झाला. सप्टेंबर २०२२ पासून जेव्हा हॉट स्प्रिंग्सवर अंतिम करार झाला तेव्हापासून या मुद्द्यांवर चर्चा सुरू आहे.

करारानुसार, दोन्ही लष्कर एप्रिल २०२० पासून त्यांच्या पूर्वीच्या स्थितीत परत येतील. तसेच, ते त्याच भागात गस्त घालणार आहेत, जिथे ते एप्रिल २०२० पूर्वी गस्त घालत होते. याशिवाय कमांडर स्तरावरील बैठका सुरू राहणार आहेत

२०२० मध्ये भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये गलवान चकमकीनंतर डेपसांग आणि डेमचोकमध्ये तणाव निर्माण झाला होता. तब्बल ४ वर्षांनंतर २१ ऑक्टोबर रोजी दोन्ही देशांदरम्यान नवीन गस्त करारावर स्वाक्षरी करण्यात आली. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले होते की लडाखमध्ये गलवान सारखी चकमक थांबवणे आणि पूर्वीसारखी परिस्थिती पूर्ववत करणे हा त्यांचा उद्देश आहे.

परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी १२ सप्टेंबर रोजी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे झालेल्या शिखर परिषदेत सांगितले होते की, चीनसोबतचा ७५ टक्के वाद मिटला आहे. सीमेवर वाढत्या लष्करीकरणाचा मुद्दा अजूनही गंभीर असल्याचेही परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले.

जयशंकर म्हणाले की, २०२० मध्ये चीन आणि भारत यांच्यातील गलवान संघर्षाचा दोन्ही देशांमधील संबंधांवर वाईट परिणाम झाला आहे. सीमेवर हिंसाचार झाल्यानंतर इतर संबंधांवर त्याचा परिणाम होणार नाही, असे कोणीही म्हणू शकत नाही.

तथापि, २५ सप्टेंबर रोजी, न्यूयॉर्कमधील एशिया सोसायटी पॉलिसी इन्स्टिट्यूटमध्ये, त्यांनी त्यांचे विधान स्पष्ट केले की ७५% विवादांचे निराकरण केले जाईल. ते म्हणाले, 'मी हे फक्त सैन्याच्या माघारीच्या संदर्भात बोललो होतो.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ४ डिसेंबर २०२४

## असल्या कारभाऱ्यांनी भाजपचे 'कंभोजीकरण' झाले : अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** भाजप नेते मोहित कंबोज यांनी सोशल मीडिया इन्फ्लुएंसर गजाभाऊ याला सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर जाहीर धमकी दिली होती. पुढील टार्गेट गजाभाऊ, कुठेही असला तरी उचलून आणणार, अशी पोस्ट मोहित कंबोज यांनी केली होती. मोहित कंबोज यांच्या धमकीला गजाभाऊ याने देखील सडेतोड उत्तर दिले होते. मोहित कंबोज यांच्या धमकीच्या पोस्टवरून ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी संताप व्यक्त करत भाजपवर निशाणा साधला आहे. असल्या कारभाऱ्यांनी भाजपचे 'कंभोजीकरण' झाल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली.

गजाभाऊ हा सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आहे. त्याचे एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर २७ हजार फॉलोवर्स आहेत. गजाभाऊ सोशल मीडियाच्या माध्यमातून नेहमीच महायुती, भाजप, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत पोस्ट शेअर केल्या आहेत. तर या पोस्टवरून देवेंद्र फडणवीसांचे निकटवर्तीय मोहित कंबोज यांनी त्या अकाऊंटला टॅग करत आता निवडणुकीनंतर धमकी दिल्याचे बोलले जात आहे.

अंबादास दानवे यांनी मोहित कंबोज यांची पोस्ट शेअर करत भाजपवर निशाणा साधला आहे. 'या असल्या कारभाऱ्यांनी भाजपचे 'कंभोजीकरण' झाले आहे. तत्ववादी नेत्यांचा पक्ष आज 'ह्याला उचल, त्याला उचल'ची भाषा करतो जे यांना अजिबात शोभत नाही.. महाराष्ट्रात अशा धमक्यांना थारा नाही, मराठी माणसाबद्दल तर अजिबात नाही!,अशी पोस्ट लिहली आहे. तर अंबादास दानवे यांनी फिकर नॉट गजाभाऊ लिहीत काळजी करू नका, असे म्हटले आहे.

एका परप्रांतीयाने मराठी माणसाला धमकी दिल्यामुळे सोशल मीडियावर वॉर सुरू आहे. १सोशल मीडिया युजर्स गजाभाऊच्या समर्थनार्थ मोहित कंबोज विरोधात ट्वीट करत आहेत, तर मोहित कंबोज समर्थकांकडून प्रत्युत्तर दिले जात आहे.

# अमेरिकेत भारतीय वंशाच्या छायाचित्रकारावर वांशिक हल्ला

**लॉस एंजेलिस :** विमानतळावर भारतीय-अमेरिकन छायाचित्रकार परवेझ तौफिक आणि त्यांच्या कुटुंबावर शटल बसमध्ये वांशिक हल्ला करण्यात आला. एका महिलेने तौफिकच्या कुटुंबावर वांशिक टिप्पणी केली आणि म्हणाली - तुमचे कुटुंब भारतातील आहे, तुम्हाला नियमांचा आदर नाही... भारतीय पागल आहेत.

महिलेच्या या कृतीमुळे युनायटेड एअरलाइन्सने तिला नो-फ्लाय लिस्टमध्ये टाकले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

महिलेने तौफिकच्या मुलावर वांशिक टिप्पणी करण्यास सुरुवात केल्याने हा प्रकार सुरू झाला. तौफिकने व्हिडिओ बनवताच महिलेने मधले बोट दाखवत आरडाओरड करण्यास सुरुवात केली.

महिला म्हणाली- तुझे कुटुंब भारताचे आहे, तुला नियमांचा आदर नाही, तुला वाटते की तू सर्वांना धक्का देऊ शकतोस. तुम्ही लोक वेडे आहात.

प्रकरण अधिकच चिघळत असल्याचे पाहून सुरक्षा रक्षकांना बोलावले असता, महिलेने स्वत:ला पीडित म्हणवून घेण्यास सुरुवात केली.

ती महिला म्हणाली- मी वर्णद्वेषी आहे याची तिला (एअरलाइन कर्मचारी) पर्वा नाही, तू माझ्यासाठी वर्णद्वेषी आहेस, मी अमेरिकन आहे.

तौफिक म्हणाला- आम्ही पण अमेरिकन आहोत.

प्रत्युत्तरात ती महिला म्हणाली- तू अमेरिकन नाहीस. ओरिजनल नाही. तुम्ही भारताचे आहात.

मात्र, इतर प्रवाशांनी छायाचित्रकाराला साथ दिली. या घटनेचा व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर करताना तौफिकने लिहिले - सध्या माझे रक्त उसळत आहे. माझा तर विश्वास बसत नाही. ती माझ्या मुलांना शांत राहायला सांगत होतो आणि माझा संयम सुटला. मी म्हणालो- तुला माझ्या मुलांशी असे बोलण्याचा अधिकार नाही.

काही काळापासून अमेरिकेत भारतीयांविरुद्धच्या वांशिक हिंसाचारात वाढ झाली आहे. २०२४ च्या पहिल्या तीन महिन्यांतही भारतीय विद्यार्थ्यांच्या हत्येच्या आकड्याने दुहेरी अंक ओलांडला होता.

कंझर्व्हेटिव्ह पक्षाने अमेरिकेच्या संसदेतही याबाबत प्रश्न विचारला होता. याला प्रत्युत्तर म्हणून व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, अशा प्रकरणांमध्ये शून्य सहनशीलता आहे. इंडो-अमेरिकन डेमोक्रॅट नेते आणि काँग्रेसचे नेते श्री ठाणेदार यांनी हिंदूफोबियाविरुद्ध लढा देण्याविषयी बोलले होते. अमेरिकेत द्वेषाला जागा नसावी यावर त्यांनी भर दिला.

# आताचे प्रेम आधी उफाळले असते, तर शिंदे गेले नसते : प्रसाद लाड



**मुंबई :** महापालिकेच्या निवडणुकीपर्यंत भाजप शिंदेंना गोंजारेल, त्यानंतर जे करत आले तसेच करतील, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली होती. या टीकेवररून भाजप नेते प्रसाद लाड यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे यांचे एकनाथ शिंदेंबाबत आता उफाळलेले प्रेम आधी उफाळले असते, तर ते सोडून गेले नसते, असा टोला प्रसाद लाड यांनी लगावला. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

राज्यात सत्ता स्थापनेच्या घडामोडींना वेग आला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर बैठकांचा सिलसिला पार पडत आहे. या बैठकीला भाजपचे महत्त्वाचे नेते उपस्थित असल्याचे दिसून येत आहे. या बैठकीसाठी प्रसाद लाड देखील आले होते. बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली.

आतापर्यंत डमगेट ते मेनगेट आणि मेनगेट तू डमगेटच्या बाहेर उद्धव ठाकरे गेलेले नाहीत. मुख्यमंत्री झाल्यानंतर मंत्रालयात ते फक्त तीन वेळा गेले. त्यांनी फेसबुक लाईव्हवर सरकार चालवले आता उफाळलेले प्रेम आधी उफाळले असते, तर एकनाथ शिंदे त्यांना सोडून गेले नसते, असा टोला प्रसाद लाड यांनी लगावला.

उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना सातत्याने वाईट वागणूक दिल्याचेही ते म्हणाले. त्यामुळेच हिंदुत्वाचा अजेंडा घेऊन आमदार बाहेर पडले. आता उरलेले आमदारही बाहेर पडतील, अशी त्यांना भीती आहे, त्यामुळे हा केविलवाणा प्रयत्न आहे, अशी टीका प्रसाद लाड यांनी केली.

प्रसाद लाड यांनी उद्धव ठाकरे यांना महायुती सरकारच्या शपथविधीचे आमंत्रण दिले जाईल की नाही, यावरही प्रतिक्रिया दिली. उद्धव ठाकरे यांना निमंत्रण दिले जाईल, शपथविधीला यायचे की नाही, हे त्यांच्यावर आहे. कोणत्या मनाचे ते लक्षण दाखवू शकतात, असे प्रसाद लाड म्हणाले.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपर्यंत भाजप एकनाथ शिंदे यांना गोंजारेल. पण एकदा निवडणुकीचा हेतू साध्य झाला की, त्यांचे काय करायचे ते करेल. भाजपने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आव आणून आपल्या विविध यंत्रणा राबवल्या. त्यांनी आरएसएसचा वापर केवळ पत्रके वाटण्यापुरता केला. सध्या सुरु असलेल्या सत्तास्थापनेच्या वादात शिंदेंच्या मागे दिल्लीतील भाजपची मोठी शक्ती आहे. भाजपचा मूळ उद्देश मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकण्याचा आहे, असे उद्धव ठाकरे माजी नगरसेवकांच्या बैठकीत म्हणाले होते.

## सोलार पंप योजनेत व्हेंडर निवडीची सुविधा उपलब्ध

मुंबई : शेतकऱ्यांची वीज बिल व अवेळी होणाऱ्या वीज पुरवठ्यापासून सुटका करण्यासाठी केंद्र सरकारने पीएम कुसुम सौर कृषी पंप योजना सुरु केली आहे. या योजनेतर्गत आता शेतकऱ्यांना आपल्या पसंतीचा व्हेंडर निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

बाजारात उपलब्ध सर्व सौर कृषी पंप कंपनीच्या किंमती जवळपास एक सारख्याच आहेत. त्यात ५ वर्षांची वॉरंटी तसेच सर्व धोक्यांपासून कव्हर देणारी विमा पॉलिसी पुरवठादारांकडून शेतकऱ्यांना देण्यात येते. एकूण किमतीच्या ९० ते ९५% अनुदान शेतकऱ्यांना मिळते. म्हणजे साधारणत: २ लाखांचा ३ HP चा सोलार पंप शेतकऱ्यांना अवघ्या २० हजार रुपयांत उपलब्ध होतो.

महाराष्ट्रात सौर कृषी पंप मान्यतेची अंमलबजावणी २ संस्था करतात. यात महावितरण व महाराष्ट्र ऊर्जा विकास एजंसीचा समावेश आहे. आत्तापर्यंत महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेने एकूण ५लाख ५ हजार सौर कृषी पंप मंजूर केलेत. त्यापैकी १,६३,९०६ सोलार पंप स्थापितही केले आहेत. दुसरीकडे, महावितरणने एकूण ७०० सौर कृषी पंप मंजूर केले असून त्यापैकी केवळ ७ सौर कृषी पंप स्थापित केले आहेत.

प्रस्तुत योजनेतर्गत महाराष्ट्रात विविध २२ कंपन्या सौर कृषी पंपांचा पुरवठा करतात. ज्या शेतकऱ्यांनी 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेचे अर्ज करून शुल्क भरलेली आहे अशा शेतकऱ्यांसाठी प्रथम टप्प्यात जिल्ह्यानुसार १४ पुरवठा विक्रेते निवडता येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना ९०% अनुदानाबरोबरच आपल्या आवडीच्या कंपनीचा सौर कृषी पंपही निवडण्याची मुभा मिळणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ४ डिसेंबर २०२४


## सदस्यता अभियानातून राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सहभागी व्हा : संजय खंबायते



**कन्नड (अरुण थोरात):** भाजप सदस्यता नोंदणी अभियानात सहभागी होऊण राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सहभागी होण्याचे अवाहन भाजप संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी केले आहे. कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघात भाजपा सदस्यता अभियान बैठक भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

भाजपा सदस्यता अभियानाला प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवून राष्ट्रनिर्माणाच्या महान कार्यात अधिकाधिक सामान्य जनतेचा सहभाग कसा करून घेता येईल, याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करत, या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राष्ट्रनिर्माणाच्या महान कार्यात सामील होण्यासाठी ८८०००२०२४ या क्रमांकावर एक मिस्ड कॉल द्या किंवा सांगितलेल्या लिंकवर क्लिक करा आणि भाजपाचे सदस्य व्हा, आणि आपले नेतृत्व आणि सहभाग सुनिश्चित करा.

विधानसभा निवडणुकीतील दणदणीत विजयानंतर भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यात पक्ष सदस्यता नोंदणी अभियान राबवण्यात येत आहे. ज्यांना संघटनात्मक जबाबदारी घेण्याची इच्छा त्यांनी वैयक्तिक रित्या कमीत कमी दोनशे प्राथमिक सदस्य करणे आवश्यक असल्याचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी सांगितले.

पुढे बोलताना खंबायते म्हणाले की, या अभियानात महाराष्ट्रात १ कोटी ५१ लाख एवढी विक्रमी प्राथमिक सदस्य नोंदणी करण्याचे उद्दिष्ट भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे. त्यानुसार जिल्ह्यासह कन्नड तालुक्यात कमीत कमी आठ ते दहा लाख प्राथमिक सदस्य करण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करायचे आहे. या अभियानाला प्रारंभ झाला असून हे अभियान चांगले राबवले जावे, यासाठी जिल्हास्तरावर सात जणांची एक समिती व मंडल स्तरावर सात जणांची एक समिती करून यांनी समन्वयाने काम केले जाणार आहे. या बैठकीला तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सुनंदा पवार यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार सोहळा संपन्न




**कन्नड (अरुण थोरात):** येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातील प्राथमिक विभागाच्या जेष्ठ शिक्षिका सुनंदा रामलाल पवार यांचा सेवागौरव समारंभ नुकताच संपन्न झाला.त्या ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या. कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संजय जाधव होते.

तर, प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य ए.बी.कांबळे, जयश्री सोनार यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमप्रसंगी प्रास्तविक प्रा.विजय भोसले यांनी श्रीमती पवार यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी प्रा.गणेश विसपूते, के.बी.अंदोरे, किरणताई पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी अरविंद कांबळे म्हणाले की, कोणतेही काम मनपूर्वक केल्यास यश मिळते. विद्यालयाच्या यशात पवार मॅडम सारख्या शिक्षकांचा वाटा आहे. संजय जाधव म्हणाले की, विद्यालयाचा नावलौकिक होईल असे काम सर्वांनी केले पाहीजे.

पवार मॅडम विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांचे काम महत्वाचे आहे. अनेक संकटे येऊनही श्रीमती पवार यांनी आपली नोकरी प्रामाणिकपणे केली.

तसेच यावेळी श्रीमती पवार यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. जिवनातील अनेक चढउताराला सामोरे जात ही सेवा मोठ्या निष्ठेने पुर्ण केली. आपल्या ३३ वर्षाची सेवाकाळात फक्त विद्यार्थी हित जपण्याचे काम केले.यावेळी गणेश ताम्हाणे, राम पाचफुले, अनुराधा इराळे,कीर्ती नानोटे, तृप्ती ताम्हणे, धर्मराज पाटील, दिलीप शहरवाले, ललित शहरवाले सह विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संजय त्रिभूवन यांनी केले.


मराठी टायपिंगसाठी
डी.टी.पी.ऑपरेटर मुले पाहिजे
------: संपर्क :------
साहिल कॉम्प्युटर्स
विद्यापीठ गेटजवळ, मोन्नज हॉटेल, जयसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
मो. 8956362639 /8087880274


# उमरगा शहरात एड्स जनजागृती रॅली




**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उपजिल्हा रुग्णालय उमरगा, जिल्हा सत्र न्यायालय उमरगा आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय एन एस एस, एन सी सी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय जागतिक दिनानिमित्त एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले.

मा. पी.बी रेमने प्रभारी अध्यक्ष, विधी सेवा समिती उमरगा तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर उमरगा आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या शुभ हस्ते रॅली चा शुभारंभ महाविद्यालयात झाला यावेळी सह दिवाणी न्यायाधीश सौ जी. पी. बनकर, सह दिवाणी न्यायाधीश मा. सौ. एस.एच. राठी, सह दिवाणी न्यायाधीश मा. श्रीमती एस पी मथुर, डॉ. सत्यजित डुकरे आय.सी. टी.सी इन्चार्ज उपजिल्हा रुग्णालय उमरगा. मा. श्री उद्धव कदम आय. सी. टी. सी जिल्हा कार्यक्रमाधिकारी. मा श्री अक्षय भालेराव आय. सी. टी. सी समन्वयक डॉ. विलास इंगळे उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले उपप्राचार्य, प्रा. जी. एस. मोरे उपप्राचार्य डॉ. डी. एस. चित्तमपल्ले, डॉ. जी एन सोमवंशी, डॉ.बी.ए. शेळके व सर्व प्राध्यापक यांची उपस्थिती होती. शहरातून रॅली चा समारोप तहसील कार्यालय येथे तहसिलदार गोविंद येरमे यांचा मार्गदर्शनाखाली झाला.

यावेळी एड्स वाचनाची शप्पथ उपजिल्हा रुग्णालय च्या वतीने देण्यात आली या रॅलीत प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## तिफण स्थानिक कविंच्या कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रामचंद्र झाडे




**कन्नड (अरुण थोरात):** त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने मेहेगाव येथील भगवानगडावर सातवा राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव कविवर्य लक्ष्मण महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली दि. ५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन किशोर मासिकाचे कार्येकारी संपादक किरण केंद्रे यांच्या हस्ते होणार आहे. या कविता महोत्सवात राज्यभरातील कवी, कवयित्री सह कवितेचे अभ्यासक सहभागी होणार आहे. निमंत्रित कवींचे कविसंमेलन व स्थानिक कविंचे कविसंमेलन असते.

स्थानिक कविंच्या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवी डॉ. रामचंद्र झाडे यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. झाडे हे कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागात प्राध्यापक आहेत. ते कवी, संत साहित्याचे अभ्यासक असून संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक आहेत. त्यांचा बाप हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. संत तुकारामांचा जनसंवाद, भाकर, आदी पुस्तके प्रसिद्ध असून तिफण संपादक मंडळाचे ते सदस्य आहेत.

त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, संदीप ढाकणे, भीमराव सोनवणे, श्रीराम दापके, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड, अनिता राठोड, शुभदा देवरे, अर्चना धाटबळे, सुरेश औटे, भरत सोनवणे आदींनी अभिनंदन केले आहे.